www.rbprecruitment.co.in

सहायक (मुख्य) परीक्षा-2014
परीक्षा दिनांक - ४ जानेवारी, 2015
पेपर क्र.-1

| | | |
|---|---|---|
| **A** | **2014** | CODE : **RO5** |
| | | प्रश्नपुस्तिका क्रमांक<br>BOOKLET NO. |
| वेळ : 1 (एक) तास | **प्रश्नपुस्तिका**<br>**मराठी व इंग्रजी** | **एकूण प्रश्न : 100**<br>**एकूण गुण : 100** |

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ]

केंद्राची संकेताक्षरे ↑ ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.fbrecruitment.co.in



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbrecruitment.co.in



1. 'काल मी मावळणारा सूर्य पाहिला.' या वाक्यातील 'मावळणारा' या विशेषणाचा प्रकार कोणता ?

   (1) सिद्ध विशेषण (2) क्रमवाचक विशेषण (3) गुण विशेषण (4) साधित विशेषण

2. 'क्ष' व 'ज्ञ' या वर्णांना वर्णमालेत स्थान देणारे कोण ?

   (1) दादोबा (2) दामले (3) सबनीस (4) चिपळूणकर

3. पर्यायी उत्तरांतील - अंशाभ्यस्त शब्दांतील गटाबाहेरचा अंशाभ्यस्त शब्द कोणता ?

   (1) कागदपत्र (2) साजशृंगार (3) गोडधोड (4) कामकाज

4. खाली दिलेल्या पर्यायी उत्तरांतील 'पररूप संधी' असलेले योग्य पर्यायी उत्तर कोणते ?

   (1) करून (2) जाऊन (3) घेईल (4) होऊ

5. 'अंत:करण' या शब्दाच्या संधीचा खालील योग्य पर्याय निवडा.

   (1) अंत: + करण (2) अंतस् + करण (3) अत:स् + करण (4) अंतर् + करण

6. वाक्यातील क्रियापदाचा कर्ता किंवा कर्म यांच्याशी पुरुष, लिंग व वचन याबाबतीत अन्वय किंवा अनन्वय म्हणजे -

   (1) प्रातिपदिक (2) धातूरुपेश (3) वाक्य पृथक्करण (4) प्रयोग

7. खालील पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचा शब्द असलेले पर्यायी उत्तर कोणते ?

   (1) च (2) ना (3) सुद्धा (4) पुढे

8. 'सरदार व जमिनदार यांचे वर्चस्व असणारे राज्यशासन' या शब्दसमूहाला खालील योग्य शब्द सांगा.

   (1) सावकारशाही (2) राजेशाही (3) सामंतशाही (4) जमिनदारशाही

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

P.T.O.

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rrbrecruitment.co.in



9. 'एवढी यात्रा कधी पाहिली नव्हती' या विधानार्थी वाक्याचे पुढीलपैकी योग्य उद्‌गारार्थी वाक्य ओळखा.

(1) वा: वा: ! एवढी यात्रा कधी पाहिली नव्हती.

(2) बाप रे ! एवढी यात्रा कधी पाहिली नव्हती.

(3) छे: छे: ! कधी नव्हती पाहिली एवढी यात्रा.

(4) हत् ! कधी नव्हती पाहिली एवढी यात्रा.

---

10. 'तू घरी जायचे होतेस' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) भावे प्रयोग (2) कर्तृ-भाव संकर प्रयोग

(3) कर्म-भाव संकर प्रयोग (4) कर्तृ-कर्म संकर प्रयोग

---

11. खालील शब्दातील वर्णरचना कशी आहे ? पर्यायी उत्तरांतील योग्य उत्तर शोधा.

'कृष्णार्पण'

(1) क + ऋ + ष् + ण् + अ + अ + र् + प् + अ + ण् + अ

(2) क् + ऋ + ष् + ण् + अ + अ + र् + प् + अ + ण् + अ

(3) क् + ऋ + श् + न् + अ + अ + र् + प् + अ + ण् + अ

(4) क् + ऋ + ष् + ण् + अ + र् + प् + अ + ण् + अ

---

12. 'यात्रेकरूंना मंदिरात प्रवेश मिळावा' या विधानाचा उपप्रकार ओळखा.

(1) विधानार्थी वाक्य (2) आज्ञार्थी वाक्य (3) विध्यर्थी वाक्य (4) संकेतार्थी वाक्य

---

13. खालीलपैकी महाप्राण व्यंजने ओळखा.

(1) ख, फ, ध (2) क, ट, प (3) च, र, व (4) ज, च, न

---

14. खालील वाक्याचा योग्य तो प्रयोग ओळखा.

'तू घरी जायचे होतेस.'

(1) कर्तृ - कर्म संकर प्रयोग (2) कर्म - भाव संकर प्रयोग

(3) कर्तृ - भाव संकर प्रयोग (4) भाव - कर्तरी प्रयोग

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



15. खालील उभयान्वयी अव्यये व त्यांचे उपप्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | 'अव्यये' | | 'उपप्रकार' |
|---|---|---|---|
| (a) | स्वरूपदर्शक | (i) | म्हणून |
| (b) | समुच्चय बोधक | (ii) | पण |
| (c) | उद्देश दर्शक | (iii) | आणि |
| (d) | न्यूनत्वबोधक | (iv) | म्हणजे |

वरील जोड्यांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

---

16. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

(अ) शब्दयोगी अव्यये नामांना जोडून येत नाहीत.

(ब) शब्दयोगी अव्यये विकारी शब्द आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर
(2) (ब) बरोबर
(3) (अ) आणि (ब) बरोबर
(4) (अ) आणि (ब) चूक

---

17. पर्यायी उत्तरांत 'चतुर्थी विभक्तीचे संप्रदान कारकार्थ' असलेले वाक्य कोणते ?

(1) मी नदीच्या काठाने गेलो.
(2) तो घरातून बाहेर पडला.
(3) तू रामाला पुस्तक दे.
(4) तो दिवसाचा चालतो.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rrbrecruitment.co.in



18. 'मंदा तू पुढे जा, हा मी आलेच' या वाक्यातील 'हा' हे सर्वनाम असून, त्याचा वापर क्रियाविशेषणासारखा केला आहे. या विधानाबाबत उत्तराचा खालील योग्य पर्याय निवडा.
   (1) या विधानाचा पूर्वार्ध चूक आहे.
   (2) हे संपूर्ण विधान बरोबर आहे.
   (3) या विधानाचा उत्तरार्ध चूक आहे.
   (4) हे संपूर्ण विधान चूक आहे.

---

19. खालीलपैकी कोणता शब्द अरबी - फारसी उपसर्ग लागून तयार झाला आहे?
   (1) दररोज (2) प्रगल्भ (3) आडकाठी (4) उपभेद

---

20. पुढीलपैकी मराठी प्रत्यय लागून झालेला तद्धित शब्द कोणता?
   (1) धार्मिक (2) जडत्व (3) उत्कंठित (4) शिष्टाई

---

21. 'आवश्यक तेथे मदत न करता, ज्याला गरज नाही त्याला मदत करणे' या अर्थाची खालील म्हण ओळखा.
   (1) भाताला तांदुळ नि पाण्याला उधाण. (2) मनसुबे केले नि दिवस निघून गेले.
   (3) भरवशाच्या म्हशीला टोणगा. (4) मानेवर गळू नि पायाला जळू.

---

22. 'जन्मा आला हेला आणि पाणी वाहून मेला' या म्हणीची विरुद्धार्थी म्हण ओळखा.
   (1) ज्ञान तिथे मान (2) जेवीन तर तुपाशी नायतर उपाशी
   (3) जने ती जाणे वांझ काय जाणे (4) आयत्या बिळात नागोबा

---

23. 'पाठ चोरणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ ओळखा.
   (1) मुळीच न दिसणे (2) कुचरपणा करणे (3) मदत न करणे (4) मदत करणे

---

24. खालील पर्यायी उत्तरांतील 'विरुद्धार्थी शब्द' असलेले पर्यायी उत्तर कोणते?

| | (अ) | (ब) |
|---|---|---|
| (1) | मित्र | रवि |
| (2) | अनुज | अग्रज |
| (3) | आदित्य | सविता |
| (4) | भानू | भास्कर |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbrecruitment.co.in



25. विरामचिन्हांचा वापर करताना 'संयोगचिन्हाचा वापर करण्यात येतो' –

(अ) दोन शब्द जोडताना.

(ब) संबोधनाकरिता वापर केला जातो.

(क) दुसऱ्याचे मत अप्रत्यक्षपणे सांगण्यासाठी.

(ड) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास.

योग्य उत्तर कोणते ?

(1) (ब) बरोबर (2) (ब), (ड) बरोबर (3) (अ), (क) बरोबर (4) (अ), (ड) बरोबर

---

26. मराठीतील 'लिंग विचार' पुढीलप्रमाणे करता येईल.

(अ) प्राणिमात्रांचे लिंग हे वास्तविक असे असते.

(ब) लिंग ओळखण्यासाठी नामाच्या रूपाचा विचार केला जातो.

(क) मराठीतील लिंग व्यवस्था ही अत्यंत अनियमित आहे.

पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा.

(1) (अ), (ब) (2) (ब), (क) (3) (अ), (क) (4) (अ), (ब), (क)

---

27. 'लवण' या शब्दाला खालील कोणता शब्द समानार्थी आहे ?

(1) लावण्य (2) लावणी (3) मीठ (4) पीठ

---

28. ध्वन्यर्थ म्हणजे ________.

(1) 'अभिधा' शक्तीमुळे जाणवणारा अर्थ
(2) 'व्यंजना' शब्दशक्तीमुळे सूचित होणारा अर्थ
(3) 'लक्षणा' शब्दशक्तीमुळे जाणवणारा अर्थ
(4) भाषेतील मूलध्वनींचा अर्थ

---

29. प्रधान वाक्यातील एखाद्या नामाशी किंवा सर्वनामाशी संबंध असणाऱ्या वाक्यास ________ म्हणतात.

(1) सर्वनाम वाक्य (2) विशेषण वाक्य (3) नाम वाक्य (4) करणरूपी वाक्य

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



30. खालील 'क्ष' आणि 'ज्ञ' गटातील चारही जोड्या योग्य जुळवणारे पर्यायी उत्तर कोणते ?

| 'क्ष' काळ | 'ज्ञ' आख्यात |
|---|---|
| (a) विध्यर्थ | (i) ईलाख्यात |
| (b) संकेतार्थ | (ii) द्वितीय ताख्यात |
| (c) आज्ञार्थ | (iii) वाख्यात |
| (d) भविष्यकाळ | (iv) ऊ - आख्यात |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (i) | (iii) | (ii) | (iv) |

31. खालील परप्रांतीय भारतीय शब्द कोणत्या प्रांतातून आले आहेत ते सांगा ?

'चिल्ली पिल्ली, सार, मठ्ठ'

(1) कानडी (2) गुजराती (3) तामिळी (4) तेलगू

32. खालील जोडशब्दातील योग्य पोटशब्द कोणते ?

'वाग्विहार'

(1) वाग् + विहार (2) वाङ् + विहार (3) वाक् + विहार (4) वाच् + विहार

33. 'मी आता मुक्याचे व्रत सोडणार नाही' या वाक्यातील शब्दशक्ती ओळखा.

(1) अभिधामूल व्यंजना (2) लक्षणामूल व्यंजना (3) लक्षण लक्षणा (4) सारोपा लक्षणा

34. 'ऐवजी' या शब्दयोगी अव्ययाचा उपप्रकार ओळखा.

(1) तुलनावाचक (2) विरोधवाचक (3) कैवल्यवाचक (4) विनिमयवाचक

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



35. पर्यायी उत्तरांतील योग्य शुद्धशब्द कोणता ?

(1) अभिनीवेश (2) अभिनिवेश (3) अभीनिवेश (4) अभीनीवेश

36. 'भगिनीमंडळ' हा शब्द खालीलपैकी कोणत्या शब्दप्रकारातील आहे ?

(1) हिंदी (2) देशी (3) तत्सम (4) तद्‌भव

37. 'ञ' हे अनुनासिक कोणत्या उच्चारण प्रकारातील आहे ?

(1) दंत्य (2) मूर्धन्य (3) तालव्य (4) कंठ्य

38. 'मेषपात्र' या शब्दाचा अर्थ सांगा.

(1) निरुद्योगी माणूस (2) श्रीमंत माणूस (3) बावळट माणूस (4) कर्तबगार माणूस

39. 'तात्कालिक' हा शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या उपप्रकारातील आहे ?

(1) उपसर्ग घटित (2) शब्दसाधित (3) धातुसाधित (4) अभ्यस्त

40. ऊ - कारांत नपुसकलिंगी नामाचे सामान्यरूप आ - कारांत होते या नियमाला खालीलपैकी कोणता पर्याय अचूक आहे ?

(1) वधू - वधूचा (2) नातू - नातवाचा (3) कोकरू - कोकराने (4) आसू - आसवाने

41. खालील म्हण पूर्ण करा. पर्यायी उत्तरांतील योग्य पर्यायी उत्तर सांगा.

'अडाण्याची मोळी ________'.

(1) भलत्यासच जाळी (2) भलत्यासच मारी (3) भलत्यासच गिळी (4) भलत्यासच टाळी

42. खालील शब्द कोणत्या 'शब्दसिद्धी' प्रकारचा आहे ?

'मस्तक'

(1) तत्सम (2) तद्‌भव (3) देशी (4) परकीय

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



43. भावे प्रयोगाचे लक्षण नसलेले उदाहरण कोणत्या पर्यायी उत्तरात आहे ?

(1) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे
(2) त्याने आता घरी जावे
(3) ती शाळेला जाते
(4) आज सारखे गडगडते

44. खालीलपैकी कोणता शब्द शुद्धलेखन नियमांनुसार अचूक आहे ?

(1) ऊच्चै:श्रवा
(2) उच्चै:श्रवा
(3) उच्चैश्रवा
(4) उच्चैश्रावा

45. खालीलपैकी कोणता शब्द अरबी भाषेतून आला आहे ?

(1) करोड
(2) गाजर
(3) अत्तर
(4) मेहनत

46. 'भद्रजन' या शब्दाचा खालीलपैकी कोणता शब्द विरुद्धार्थी आहे ?

(1) सज्जन
(2) दुर्जन
(3) प्रेमीजन
(4) विद्वत्जन

47. पर्यायी उत्तरांतून योग्य ते पर्यायी उत्तर शोधा.

'भाषा नदीच्या प्रवाहाप्रमाणे असते.' कारण –

(1) भाषेच्या प्रवाहात वळणे नसतात.
(2) भाषेमध्ये बदल होत जातात.
(3) भाषेच्या व्याकरणाच्या नियमांना मुरड घालावी लागत नाही.
(4) भाषेचा प्रवाह अखंड चालू नसतो.

48. 'ळ' वर्ण कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) उष्मे
(2) स्पर्श
(3) महाप्राण
(4) स्वतंत्र

49. 'तो घोड्यास पळवतो' या वाक्यातील पळवतो या क्रियापदाचा उपप्रकार कोणता ?

(1) शक्य क्रियापद
(2) प्रयोजक क्रियापद
(3) सिद्ध क्रियापद
(4) सहाय धातू

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



50. 'गंगेत गवळ्यांची वस्ती' या वाक्यात कोणती शब्दशक्ती आहे ?

(1) अभिधा (2) लक्षणा (3) व्यंजना (4) योगरूढ

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 51 ते 55 ची उत्तरे लिहा.**

प्राचीन काळांत सहज ओझरती नजर फेंकली, तरी विचारांची प्रचंड चळवळ दिसून येईल. यास्काचार्यांच्या नुसत्या निरुक्तांत पाहिले तर वेदांच्या अभ्यासासाठी निरनिराळ्या दृष्टीच्या शेंकडों मंडळांचीं नांवें त्यांत आलेलीं आहेत. इतिनैरुक्तिकाः, इति आख्यायिकाः, इति ऐतिहासिकाः अशी निरनिराळीं अभ्यासमंडळें यास्क देत आहेत. तसेंच उपनिषत्काली सर्वत्र तत्त्वज्ञानाची प्रचंड व अखंड चर्चा चाललेली दिसते. शेंकडों मतें, शेंकडों पंथ, शेंकडों सूक्ष्म छटांचें तत्त्वज्ञानी आपणांस दिसून येतात.

मीमांसक ईश्वर मानीत नसत; चार्वाकपंथी परलोक वगैरे मानीत नसत. कणाद वगैरे सारी सृष्टि परमाणूपासून झाली असें म्हणत. बुद्धपंथी सारें क्षणिक आहे असें मानीत. शेंकडों मतें होतीं; परंतु कुणाचा छळ झाला नाहीं. युरोपमध्ये नवविचार देणाऱ्यांच्या होळ्या करण्यात आल्या. भारतात तसें झालें नाहीं. प्रत्येकाच्या प्रामाणिक मताला येथें मान देण्यांत येत असे.

ज्ञान म्हणजे पोरकटपणा समजण्यात येत नसे. एकेक गोष्ट समजून घ्यावयास तपेंच्या तपें देत. उपनिषदांत अनेक ठिकाणी ज्ञानासाठी ब्रह्मचर्यपालन करून कशी तपश्चर्या करीत, कसे चिंतनांत गढून जात, तें आलें आहे. ज्ञान मागण्यासाठीं वाटेल त्याच्याकडे जात. ब्राह्मण क्षत्रियाकडे जाई. क्षत्रिय ब्राह्मणाकडे जाई. ब्राह्मण तुलाधारासारख्या वैश्याकडे ज्ञानासाठीं नम्रपणें जाई. ज्ञान कोठेंहि असो, ते पवित्र आहे. सूर्याचा प्रकाश कोठूनही आला तरी तो घेतला पाहिजे. झाडांचीं मुळें मिळेल तेथून ओलवा घेण्यासाठीं धडपडत असतात. त्याप्रमाणेंच ज्ञानोपासकाची दृष्टि हवी. देवांचा कच दैत्यांच्या गुरुकडेहि जाईल आणि दैत्यांचा गुरुहि शत्रूकडच्या शिष्याला प्रेमानें सारें ज्ञान देईल. ज्ञानाच्या प्रांतात शत्रु - मित्र नाहीं.

समाजाला नवविचार देणें म्हणजे फार थोर साधनाच आहे. विचाराचा डोळा समाजाला देणें याहून धन्य तर दुसरें काय आहे ? चिंतन करून आपणांस जो विचार सुचला, त्याला पूज्य मानून तो सदैव प्रकट केला पाहिजे. त्याची वाढ केली पाहिजे, तो सर्वांसमोर निर्भयपणें मांडला पाहिजे. तो सोडतां कामा नये.

ज्ञानाचें बाह्य स्वरूप कोणतेंही असेल. त्या त्या बाह्यांगाची पूजा करण्यासाठीं मनुष्य निःस्वार्थपणें कसा धडपडतो आहे, तें पाहिलें पाहिजे. ज्ञानाचें बाह्यांग व्याकरण असेल. व्याकरणरूपी परब्रह्माची एखादा पाणिनी अहोरात्र पूजा करू पाहील. त्या पाणिनीस भगवान ही पदवी भारतीय संस्कृती देईल. शंकराचार्य पाणिनीचा उल्लेख भगवान पाणिनी असा सदैव करतात. पाणिनी ज्ञानाच्या एका स्वरूपात रमले. त्यांना दुसरे तिसरे कांहींच सुचत नव्हतें, रुचत नव्हतें. व्याकरण म्हणजे त्यांचा वेदान्त. जे कोणी येतील त्यांना ते व्याकरण शिकवीत. एके दिवशी तपोवनांत ते व्याकरण शिकवीत असता एकदम एक वाघ आला. वाघाला पाहून पाणिनी पळाले नाहींत. वाघाला पाहून व्याघ्र शब्दाची ते व्युत्पत्ती सांगू लागले! वास हुंगत हुंगत येत होता. पाणिनी म्हणाले, ''वास घेत घेत येणारा हा पाहा वाघ.'' 'व्याजिघ्रति स व्याघ्रः' पाणिनी व्युत्पत्ती सांगण्याच्या आनंदात होते. शिष्य केंव्हाच पळून गेले होते! वाघानें पाणिनीवर झडप घालून त्यांना खाऊन टाकलें! ज्ञानाची किती थोर उपासना! ज्ञानाची उपासना करणारा सर्व कांहीं विसरून जातो. त्याच त्या विचारांशीं तो तन्मय होतो. त्याची जणूं समाधि लागते. समाधि म्हणजे सर्वत्र ध्येयाचाच साक्षात्कार होणें. समाधि म्हणजे ध्येयतर सृष्टी चें विस्मरण! समाधि म्हणजे सर्व सृष्टीचें विस्मरण नव्हे.

51. सर्वात थोर साधना कोणती ?

(1) समाजाला नव-नवे विचार देणे

(2) मृत्यूजवळ ज्ञान मागणे

(3) व्याकरणाचा अभ्यास करणे

(4) ब्रह्मचर्य पालन करणे

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rrbrecruitment.co.in



52. वैचारिक भिन्नता असूनही भारतात विचारवंतांचा छळ का झाला नाही ?
 (1) यास्काचार्यांची निरूक्ती महान ठरली. (2) विचार ब्रह्मचर्यपालनातून मिळाले होते.
 (3) ज्ञान सर्वांकडून मिळवले जाई. (4) प्रत्येकाच्या प्रामाणिक मताला सन्मान मिळे.

53. तत्त्वज्ञानाची अखंड चर्चा कोणत्या काळात चाललेली दिसते ?
 (1) वेदांच्या काळात (2) वेदपूर्व काळात (3) इंग्रजांच्या काळात (4) उपनिषदांच्या काळात

54. पाणिनीने कोणत्या गोष्टीला परब्रह्म मानले होते ?
 (1) वेदांना (2) उपनिषदांना (3) व्याकरणाला (4) वाघाला

55. ज्ञानाची उपासना करणाऱ्याची अवस्था कशी होते ?
 (1) वेदांचे ज्ञान प्राप्त होते. (2) तो नवविचारांनी परिपूर्ण होतो.
 (3) त्याला ध्येयेतर सृष्टीचे विस्मरण होते (4) त्याला वाघाकडून मृत्यू येतो.

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 56 ते 60 ची उत्तरे द्या.**

जीवनाच्या कितीतरी परीक्षांमध्ये आपल्याला अपयश येते. पण केवळ अपयश आले म्हणून आपण धीर सोडता कामा नये. हिंमत धरून आणि आपल्या अपयशाची कारणे समजावून घेऊन योग्य दिशेने आत्मविश्वासपूर्वक व जोमाने आपण प्रयत्न केले तर आपले ईप्सित साध्य होण्याच्या मार्गात कोणतेच अडथळे येणार नाहीत. ज्ञान-संपादनाची आपली आवड व यशाची ईर्षा आपण कायम राखली तर अपयशामुळे आपण अधिक कार्यक्षम व कार्यप्रवण बनू शकतो, असाच आपल्याला अनुभव येईल.

साहित्य, संगीत, नाटक, चित्रकला ह्यांसारख्या कलांनी माणसाच्या जीवनाला समृद्धी आणलेली आहे, मानवाला सुसंस्कृत बनविले आहे. परंतु एखादा माणूस साक्षर असूनदेखील सुसंस्कृत नसतो. कारण जीवनातील आनंद कसा लुटावा हे त्याला ठाऊक नसते. कलेचे रहस्य जाणण्याची दृष्टी त्याला प्राप्त झालेली नसते. त्यामुळे जीवनात त्याचे मन कोठेच रमत नाही. त्याला कशापासून देखील विरंगुळा मिळत नाही. अशा प्रवृत्तीपासून आपण दूर राहिले पाहिजे. माझ्या जीवनाकडे मी जेव्हा दृष्टिक्षेप टाकतो त्यावेळी सुदैवाने मला जीवन आनंदमय वाटते व नव्या क्षितिजांच्या ओढीने माझे मन अद्यापही भारावून जाते.

माणसाने आपल्या जीवनातील वास्तवता लक्षात घ्यावयास हवीच. निव्वळ स्वप्नसृष्टीत काही आपण वावरू शकत नाही. ध्येयवादी वृत्तीने कार्य करीत असताना स्वप्नाळू श्रद्धा उपयोगी पडत नाही. जीवनातील कटू सत्यावर प्रकाश टाकणाऱ्या व वास्तवतेची झळ कमी करणाऱ्या हास्यरसाची जोड त्याला हवीच. गंभीर गोष्टींकडेसुद्धा काहीशा स्मित वदनाने पाहता येण्याएवढा सोशिकपणा अंगी असावयास हवा. रोजच्या व्यवहारात अशा वृत्तीने जर आपण काम करू शकलो तर क्षणाक्षणाला जीवनाचा आनंद आपल्याला लुटता येईल.

काहीतरी नवे शोधावे व जे सापडले त्यात रस घ्यावा अशा प्रवृत्तीने आपण जीवन जगलो तरच त्याला जगणे म्हणता येईल. ह्यात काय आहे ? त्यात काय आहे ? अशा तुसड्या वृत्तीने आपण जर प्रत्येक क्षण वाया घालविला तर जीवनाचा लपंडाव आपण हरलोच असे समजावयास हरकत नाही. जीवनात जे सुखाचे क्षण येतात ते सूर्याच्या कोवळ्या किरणासारखे सोनेरी व सतेज असतात. ते क्षणभर राहतात आणि नंतर कडक होतात. परंतु ज्यावेळी हे किरण कोवळे दिसतात त्यावेळी त्यांचे ते तेज, ते रम्य स्वरूप पाहून मनाला आल्हाद वाटतो, गंमत वाटते.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



56. जीवनातील आनंद कसा लुटावा ?

(अ) कलेचे रहस्य जाणण्याची दृष्टी प्राप्त करावी.

(ब) जीवनात मन भरकटत ठेवावे.

(क) विरंगुळ्यापासून दूर राहून.

(ड) नव्या क्षितिजाची ओढ लावून घ्यावी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) (2) (ब), (क) (3) (अ), (ड) (4) (अ), (ब), (क), (ड)

---

57. जीवनातील सुखाचे क्षण कसे असतात ?

(अ) ते सूर्याच्या कोवळ्या किरणासारखे सोनेरी व सतेज असतात.

(ब) ते सूर्याच्या कोवळ्या किरणासारखे क्षणभर राहतात आणि नंतर कडक होतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (ब) चूक (2) (ब) बरोबर (अ) चूक

(3) (अ), (ब) बरोबर (4) (अ), (ब) चूक

---

58. कोणत्या कलांनी माणसाच्या जीवनाला समृद्धी आणलेली आहे ?

(अ) साहित्य (ब) नाटक (क) चित्रकला (ड) संगीत

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (क), (ड) (3) (अ), (ब), (क), (ड) (4) (ब), (ड)

---

59. कोणत्या प्रवृत्तीला जगणे म्हणता येईल ?

(अ) काहीतरी नवे शोधणे.

(ब) तुसड्या वृत्तीने वागणे.

(क) जे सापडेल त्यात रस घेणे.

(ड) नाहक प्रत्येक क्षण वाया घालविणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (अ), (ब) (3) (क), (ड) (4) (अ), (क)

---

60. माणसाने आपल्या जीवनात कोणती गोष्ट लक्षात घ्यावयास नको ?

(1) स्वप्नाळू श्रद्धा (2) ध्येयवादी वृत्ती (3) सोशिकपणा (4) हास्यरसाची जोड

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



61. Identify the type of sentence.

Do or Die

(1) Simple (2) Compound (3) Complex (4) Complex-Compound

62. Fill in the blank with correct alternative.

There is an ________ difference between man's laughter and murder.

She was very ________ of our efforts to help.

(1) affective and effective (2) appreciable and appreciative

(3) effective and appreciable (4) none of these

63. Spot the word to which a suffix has been added :

(1) scarlet (2) scandal (3) starlet (4) sandal

64. Consider the following sentences :

(a) when the hunter saw the tiger, he climbed up a tree.

(b) on seeing the tiger, the hunter climbed up a tree

**Answer Options :**

(1) (a) is simple sentence and (b) is compound

(2) (a) is compound sentence and (b) is simple

(3) (a) is complex sentence and (b) is simple

(4) (a) is simple sentence and (b) is complex

65. Locate the unit with a grammatical error, if any :

<u>In language, we have to resort to pauses</u>/<u>and the pauses in writing</u>/
A B
<u>are denoted upon the marks of punctuation</u>
C

(1) A (2) B (3) C (4) No error

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rrbrecruitment.co.in



66. Choose the meaning of the underlined idiom :

He is a stick - in - the - mud.

(1) a person who is too strict

(2) a person stuck in mud

(3) a person who dislikes modern things

(4) a person who resists change

---

67. Identify the underlined term :

We know why he hasn't come.

(1) Adjectival Clause (2) Adverbial Clause

(3) Noun Clause (4) Adverbial Phrase

---

68. Fill in the blank.

The management must not ________ between male and female applicants.

(1) differ (2) contrast (3) choose (4) discriminate

---

69. In which part of the sentence does the error lie ?

I would have been working (I) / in this organization (II) / for ten years next year (III).

(1) Only I (2) Only II (3) Only III (4) None

---

70. (a) The desert looked awesome.

(b) Everyone has got according to his deserts.

What do the underlined words above respectively mean ?

**Answer Options :**

(1) Sweet dish and ability (2) Sandy land and ability

(3) Sandy land and worthiness (4) Sweet dish and worthiness

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



71. Choose the synonym for the underlined word :

Let me give you a <u>fable</u>.

(1) unbelievable story (2) imaginary story

(3) manufactured item (4) moral lesson

---

72. Which of the following sentences are grammatically **correct** ?

(a) Hallowed be thy name !

(b) The king ordered that the prisoner be beheaded.

(c) Had I your talent, I would have created a sensation.

(d) If only I were rich !

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (c) and (d)

(3) All incorrect (4) All correct

---

73. Choose the antonym for the underlined word :

He is an <u>erudite</u> person.

(1) Learned (2) Rude (3) Ignorant (4) Scholarly

---

74. Which of the given options carries the meaning of the underlined idiom ?

Now that he has <u>thrown down the gauntlet</u>, we will have to work harder.

(1) backed off (2) increased the compensation

(3) turned vicious (4) thrown a challenge

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbrecruitment.co.in



75. Fill the blank with the most appropriate word from the ones given below :

How have you ________ in your exams ?

(1) fared (2) faired (3) feared (4) feered

76. Very few opening batsmen are as talented as Gautam.

Which, among the options given below is the most acceptable comparative degree conversion of the above sentence ?

(1) Gautam is more talented than any other batsman.

(2) Gautam is more talented than many other batsmen.

(3) Gautam is more talented than most other batsmen.

(4) Gautam is more talented than any other batsmen.

77. Choose the correct word which can be substituted for the given words.

A person indifferent to pleasure and pain.

(1) stoic (2) neutral (3) critic (4) egoist

78. Choose the most appropriate antonym for the underlined word from the options given below :

Showing deference up to a certain point is acceptable.

(1) respect (2) disrespect (3) fear (4) bravery

79. Choose the most appropriate synonym for the underlined word :

His last days were spent in great penury.

(1) poverty (2) affluence (3) pain (4) activity

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rrbrecruitment.co.in



80. Spot the wrongly spelt word :

(1) carreer (2) carrier (3) carriage (4) carrack

81. Choose the most appropriate phrase for the underlined words :

His company is <u>passing through difficult times</u>.

(1) in a tailspin (2) breathing its last (3) in the doldrums (4) on a razor's edge

82. Fill the blank with the correct form of the word given in the options :

He felt that death was preferable ________ indignity.

(1) than (2) for (3) to (4) against

83. <u>Had I the wings of bird</u>, I would fly away.

The underlined clause is ________

(1) Adverb clause of Purpose (2) Adverb clause of Reason

(3) Adverb clause of Condition (4) Adverb clause of Imagination

84. Complete the following sentence choosing the **correct** alternative.

His father ________ cotton and corn.

(1) deals with (2) deals out (3) deals by (4) deals in

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbrecruitment.co.in



85. It was a job that ran me ragged

Choose the meaning of the word 'ran'

(1) moved freely (2) brought to a given condition

(3) moved swiftly (4) caused to flow

---

86. The film world is made up of bean monde

The underlined word means _________.

(1) beautiful monday (2) spirited people

(3) artistes (4) the fashionable world

---

87. What do the underlined words below respectively rhyme with ?

They row with great coordination.

The row between the two brothers has finally ended.

(1) 'now' and 'go' (2) 'go' and 'now'

(3) Both rhyme with 'go' (4) Both rhyme with 'now'

---

88. Choose the most correct option to fill in the blank :

The word 'fast' can be used as _________.

(1) Only adjective and noun (2) Only adjective and adverb

(3) Only noun, adjective and adverb (4) Noun, adjective, verb and adverb

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbrecruitment.co.in



89. Fill the blank with the correct form of the word given in the bracket :

He could not be purchased by any ________ (induce).

(1) induction (2) inducement (3) induceness (4) inducity

90. Choose the word which is nearest in meaning in the context to the word underlined.

He is believed to be a very <u>industrious</u> worker.

(1) successful (2) sensible (3) punctual (4) diligent

91. Fill the blank with the grammatically correct option :

Delhi is bigger than Mumbai, but between the two, Mumbai is ________ interesting city.

(1) the more (2) the most (3) more (4) most

92. Fill the blank space with a suitable term to make the most acceptable statement :

If he begins disliking you, you are ________.

(1) done in (2) done for (3) done over (4) done out

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



93. The painting was so beautiful that everyone admired it.

The subordinate clause in the above sentence is ________.

(1) Adverb clause (2) Adjective clause

(3) Both (1) and (2) (4) Noun clause

---

94. Pick a word from the options that fits both the blank spaces given below :

An important duty of a ________ of a church is to conduct the prayers. The ________ was out on a tour of his constituency.

(1) minister (2) member (3) representative (4) rector

---

95. Identify the grammatically correct sentence :

(a) Mump is a painful affliction.

(b) Mumps is a painful affliction.

(c) Mumps are a painful affliction.

(d) Mumps are painful afflictions.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Only (c) (4) Only (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbirecruitment.co.in



**Directions for the question number 96 to 100 :**
**Read the passage below and answer the questions that follow :**

India is a difficult country to characterize, and Indians not easy to define, especially today when they are in transition, emerging from the shadows of history into the glare of a globalizing world. The book is an attempt to try and understand who we really are, in the context of the past, and the framework of the future. The task is fraught with dangers. India is too big and too diverse to allow for convenient cover-all labels. To every generalization there is a notable exception. For every similarity there is a significant difference. I would like, therefore, to apologize in advance for anything in this book which hurts the sentiments of some, or appears to be contrary to their perception about themselves. My only consideration has been to paint as truthful a portrait as possible, but I accept that truth is not universal and could have notable exception. I must mention too that I have on occasions used the word Hindu and India interchangeably. This is not motivated by any chauvinism, but only because such a large majority of Indians are Hindus. In any case, there are traits which are decidedly Indian, and are applicable to all Indians, irrespective of their religious beliefs.

India appears to be on the threshold of take-off today, but the reasons for this have to go beyond the euphoria of the current 'feel-good' wave. In analyzing a people who have been in the crucible of history for millennia, no picture can be starkly black or white. Not everything can be right and not everything wrong. The challenge is to draw a balance sheet calculated on the foundational strengths of a people, and to essay the arguments that in spite of the obvious weaknesses, the strengths would prevail. Culture, history and the structure of society play a vital role in this calculation. So does the innate resilience of a people, and their aspirations and ambitions. In our case we must also take into account our inexplicable talent to muddle through, the ability to convert weakness into strength, and of course, luck.

96. The writer wants to apologize to the readers because ________.
    (a) he is sure to hurt their sentiments
    (b) they have a contrary perception of India
    (c) he proposes to paint a truthful portrait
    (d) on occasions he has used the word Hindu

    **Answer Options :**
    (1) All of the above reasons
    (2) None of the above reasons
    (3) Only (a) and (b)
    (4) Only (a), (b) and (c)

97. Fill the blank with the best among the options given :
    The passage is an excerpt from the ________ of the book.
    (1) preface
    (2) first chapter
    (3) middle chapter
    (4) last chapter

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rbrecruitment.co.in



98. In analyzing a people, the things that play a vital role are :

(a) their obvious weaknesses

(b) their culture and history

(c) their innate resilience

(d) their aspirations and ambitions

**Answer Options :**

(1) Only (a), (b) and (c) (2) Only (b), (c), and (d)

(3) All of the above (4) None of the above

99. The writer says that there are traits ________.

(a) that are decidedly Hindu

(b) that are decidedly Indian

(c) that are applicable to all Indians

(d) that are interchangeably Indian and Hindu

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)

(3) Only (a) and (d) (4) All four

100. What has **not** been mentioned in the passage ?

(1) India is in a state of transition.

(2) India has had a rich history.

(3) Understanding India is a difficult job.

(4) India has begun to arrive on the global scene.

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.

www.rfbrecruitment.co.in



## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **माञ परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

Note :The Information Provided here is only for Reference.It may vary the original.